# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६२२ दिनांक ०३.०८.२०२०

१.फिर्यादी महिला वय-३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा- वसई पश्चिम, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.१९/०३/२०२० रोजी ०३.५२ वाजता ते १५/०७/२०२० रोजीचे दरम्यान आरोपीत क्रमांक ०१ याने मैसेज करुन ओळख निर्माण करुन फिर्यादी यांना लग्नाचे आमिष दाखवुन व आरोपीत क्रमांक २ ८१३०५१५८१३ मोबाईल नंबर धारक यांनी दोघांनी मिळुन अन्यायाने संगणमत करुन फिर्यादीकडुन ४,५२,३५०/- एकुण (चार लाख बावन्न हजार तीनशे पन्नास रुपये) ट्रान्सफर करुन घेवुन फिर्यादीचा विश्वासघात करुन फसवणुक केली आहे. म्हणुन **माणिकपुर पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I २६५/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०, ३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२.फिर्यादी पोना/८६४ संतोष हनुमंत गायकवाड, नेम. वसई पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि.०१/०८/२०२० रोजी ०१.१० वाजता आरोपीत यांनी रस्ता खोदत असताना तसेच विना मास्क व सोशल डिस्टंन्स चे नियम तोडुन काम करित असताना मिळुन आले सदर इसम यांनी मा. जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरण पालघर यांचेकडील मनाई आदेशाचा भंग केला. म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. II २९४/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये ५१ बी प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पोशि/ ६९४ प्रफुल शिवाजी सरगर वय २९ वर्षे नेम. वसई पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि.०१/०८/२०२० रोजी ११.२० ते १२.०० रोजी आरोपीत यांनी सोशल डिस्टनसिंगचे पालन न करता मास्क गळ्यात अडकवुन मा.जिल्हाधिकारी यांचे मनाई आदेशाचा भंग करुन रस्त्या वरील वहातुक रोखली म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. II २९५/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३४१, १८८,२६९ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये ५१ बी प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४.फिर्यादी पो.शि/ संदिप सोपान दराडे,नेमणुक-तुळींज पोलीस ठाणे जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.०१/०८/२०२० रोजी ११.१५ वाजताचे सुमारास आरोपीत याने महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन परिपत्रक क्र.डीआयएस-०६२०/प्र.क्र.९१/विशा १ ब दिनांक-१७ जुलै २०२० व तुळींज पोलीस ठाणे जावक क्र.४९९/२०२० दिनांक ०१/०८/२०२० रोजी सीआरपीसी १४९ अन्वये देण्यात आलेल्या नोटीसीचा भंग करुन हाऊसिंग सोसायटीचे आवारात कुर्बानी करण्यास बंदी असतांना देखील रिलायबल टॉवर, आचोळे रोड, चंदन नाका येथे कुर्बानी करीत असतांना मिळून आला आहे. म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. II ६८२/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

५.फिर्यादी वय ४० वर्षे, व्यवसाय नोकरी, रा.नालालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२८/०७/२०२० रोजी रात्री ११:३० वाजेचे सुमारास मयत यांचे घराबाहेर दोन अनोळखी इसम हे आरडाओरड करुन गोंधळ करीत असल्याने मयत यांनी सदर दोन्ही अनोळखी इसमांना शांतता

राखण्यास सांगीतले. त्या गोष्टीचा दोन्ही अनोळखी इसमांना राग येवुन त्यांनी मयत यांना लाथाबुक्यांनी व ब्लेडने मारहाण करुन गंभीर दुखापत केली व मयत यांची पत्नीचे डोक्याला दुखापत करुन जखमी केले. मयत यांना झालेल्या गंभीर दुखापतीमुळे त्यांना उपचारा करीता सायन रुग्णालय, मुंबई येथे दाखल केले असतांना त्यांचा दिनांक ०२/०८/२०२० रोजी सकाळी ०७:३० वाजता मृत्यु झाला आहे. म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I ६८३/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०२, ३२४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

६.फिर्यादी पुरुष वय-३० वर्षे व्यवसाय-नोकरी मुळ रा.अंधेरी पु.मुंबई, यांनी फिर्याद दिली की, दि.२९/०७/२०२० रोजी सकाळी ११.३० वा.चे सुमारास फिर्यादी यांचा पुतण्या व भाचा असे ढाब्यावरुन चिचोंटी वसई बाजुकडे जात असतांना आपले ताब्यातील वाहन रहदारीचे नियमाकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात हायगयीने व अविचाराने चालवुन रस्त्यात उभ्या असलेल्या ट्रक वर आदळुन ठोकर मारुन अपघात करुन सदर अपघतात मयत यास गंभीर दुखापती होऊन त्याचे सोबत असणारा याचे पायाचे हाड मोडुन गंभीर दुखापती होऊन त्यात मयत हा स्वतःचे मरणास कारणीभुत होऊन पाठिमागे बसलेला साक्षिदार याचे पायाचे हाड मोडणेस कारणीभुत होऊन मोटार सायकलीचे नुकसान केले म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I ६७१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), ३३७, ३३८, २७९ सह मो.वा.का.कलम-१८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे..

७. फिर्यादी पुरुष वय-४० वर्षे व्यवसाय-नोकरी रा. कालंम्मा रोड,बेल्लारी राज्य-कर्नाटक, यांनी फिर्याद दिली की, दि.२४/०७/२०२० रोजी सकाळी ०७.०० वा ते ०८.०० वाजताचे सुमारास फिर्यादी हे त्यांचे कारने मुंबई अहमदाबाद रोडवरुन वसई बाजुकडुन मुंबई बाजुकडे त्यांचे परिवारासह जात असतांना यातील एक्स यु व्हि मोटार कार वरिल चालकाने त्याचे ताब्यातील कार हि अविचाराने व हायगयीने भरधाव वेगात चालवुन फिर्यादी यांचे कारला ठोकर मारुन अपघात करुन अपघातामध्ये फिर्यादी यांचा भाऊ यास गंभीर दुखापत करुन व फिर्यादी यांचे पत्नीस दुखापती करुन फिर्यादी यांचे भावाची पत्नी हिचे मरणास व गाडीतील इतर नातेवाईक यांना किरकोळ दुखापतीस कारणीभुत होऊन अपघाताची खबर न देता पळुन गेला म्हणुन गेला साक्षिदार याचे पायाचे हाड मोडणेस कारणीभुत होऊन मोटार सायकलीचे नुकसान केले म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I ६७२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), ३३७, ३३८, २७९ सह मो.वा.का.कलम- १८४, १८७ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

८. फिर्यादी पुरुष वय ३५ वर्षे धंदा. नोकरी रा.नवापाडा ता.जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.०२/०८/२०२० रोजी १८.०० वा.चे सुमारास मयत हे फिर्यादी यांचे होंडा कंपनीचे शाईन वरुन फिर्यादी यांचे मावशी यांचे राहते घरी त्यांचे राशनच्या धान्याच्या पिशव्या या जड असल्याने ठेवण्याकरीता मयत यांना मोटार सायकलवर पाठीमागे बसवुन घेवुन जात असतांना यातील आरोपीत याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही बोईसर बाजुकडुन भरधाव वेगात,बेदकारपणे चालवुन फिर्यादी यांचे मोटार सायकलला पाठीमागुन जोरदार ठोकर मारुन फिर्यादी यांचे डावे पायाचे घोटयास मुका मार लागुन मयत यांचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन **तारापुर पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I ३९/२०२० भा.दं.वि.सं.कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८ सह मो.वा.का.क. १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.